!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# पाकिस्तान सोबत निष्फळ चर्चा बंद करा- शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत मागणी

**संभाजीनगर ( ता.०६ ) :** वारंवार हिंदुस्थानावर अतिरेकी कारवाया करणाऱ्या तसेच आंतराष्ट्रीय बैठकीत शांतीचा सल्ला देणाऱ्या पाकिस्थानसोबत निष्फळ चर्चा बंद करुन जशासतसे उत्तर देण्याची गरज आहे. मुंबई २६/११ चा हल्ला असो, २७ जुलैचा पंजाबमध्ये गुरुदासपुरची आतंकवादी घटना, जम्मु कश्मीरच्या उधमपुर येथे हल्याच्या तयारीत असलेला लश्ष्कर-ए-तोयबाचा आतंकवादी मोहम्मद नावेद हा अतिरेकी असो अशा कित्येक घटना देशाविरोधी घडत असतांना कायम खोडी करणाऱ्या पाकिस्थानला आंतरराष्ट्रीय स्तरावर जाब विचारावा अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत शुन्य प्रहार काळात केली.

यावेळी केंद्रिय गृहमंत्री राजनाथ सिंह यांना दिलेल्या निवेदनात शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे म्हणाले की जो पर्यत हिंदुस्थानमध्ये पाकिस्थान आतंकवादी पाठवणे बंद करीत नाही. तोपर्यत हिंदुस्थानने पाकिस्थानशी कोणत्या प्रकारे व्यवहार व बोलणी बंद करायला हवी. तसेच ता.२३-२४ ऑगस्ट मध्ये हिंदूस्थान आणि पाकिस्थान यांच्यामध्ये होणाऱ्या राष्ट्रीय सुरक्षा बैठक रद्द करण्यात यावी व आतापर्यंत केलेल्या सर्व आतंकवादी कारवायाच्या चौकशीला सहकार्य करत नाही, तोपर्यंत पाकिस्थानशी निष्फळ बोलणी बंद करा अशी मागणी यावेळी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत शुन्य प्रहारात केली. या विषयाला गंभीर स्वरुप देण्याचे गरज असल्याचे लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांनी यावेळी नमूद केले आहे.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400